**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

दिनांक 14 / 10 / 2021 (गुरुवार)

## पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांच्याकडुन अवैध दारू विक्रेत्यांना मोठा दणका

१) कळमेश्वर हद्दीतील मौजा गोंडखैरी पारधी बेडा येथील दारू अड्डयावर धाड

पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील गोंडखैरी शिवारातील पारडी बेडा (वस्ती) येथे काही लोक अवैधरित्या गावठी दारू निर्मीती करण्याकरीता मोठया प्रमाणात मोहाफुलाचा सडवा साठवुन तसेच दारू गाळण्याकरीता लागणारे साहित्य व विविध भागात गावठी हातभट्टी तयार करून ठेवली आहे. व या हातभट्टीद्वारे प्रतीदिन मोठया प्रमाणावर गावठी दारू तयार करून नागपूर ग्रामीण व नागपूर शहरात पुरवठा करीत आहे अशी खात्रीशिर माहिती नागपूर ग्रामीण चे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर यांना मिळाली. त्यावरून त्यांनी गोंडखैरी येथील पारधी बेडयावर जावुन प्रभावी कार्यवाही करण्याकरीता सावनेरचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अशोक सरंभळकर यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल जिट्टावार आणि कळमेश्वरचे ठाणेदार आसिफराजा शेख यांचे अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच पोलीस मुख्यालयातील राखीव आरसीपी पथकासह सुमारे १०० पोलीसांचे विशेष पथक तयार करून पारधी बेडयावर सुरू असलेल्या अवैध दारू निर्मीती धंदयावर रेड करण्याकरीता गोपनियरित्या योजना तयार केली. नियोजनबध्द तयार केलेल्या योजनेनुसार दिनांक १४.१०.२०२१ चे पहाटे ०५.०० वा. च्या सुमारास सावनेरचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अशोक सरंभळकर यांचे नेतृत्वातील विशेष पथकाने एकाच वेळी संपुर्ण पारधी बेडयाचा घेराव करून रेड केली. पोलीसांच्या या गोपनियरित्या पडलेल्या धाडीमुळे सदर परिसरात अवैध दारू गाळणाऱ्या लोकांमध्ये धावपळ निर्माण झाली व त्यांना कुठलीही संधी न मिळाल्याने पारधी बेडयावर पोलीसांना मोठयाप्रमाणात मोहाफुल सडवा रसायण, गावठी हातभट्टीची दारू, दारू गाळण्याकरीता वापरण्यात येणारे प्लास्टीक व लोखंडी ड्रम, प्लास्टीक डबकी, लोखंडी पिपे, ॲल्युमिनीयम चे मोठे भांडे, लोखंडी पाईप, प्लास्टीक नळया असे साहित्य विविध ठिकाणी मिळुन आले. तसेच पारधी बेडयावर वेगवेगळया ठिकाणी चुली उभारून भट्टीची निर्मीती करण्यात आल्याचे दिसुन आले. विशेष पथकातील पोलीसांनी मोठयाप्रमाणावर गावठी हातभट्टया उध्वस्त करून पारधी बेडयावरून १८५६० लिटर मोहाफुल सडवा कच्चे रसायण, १००५ लिटर गावठी हातभट्टी दारू व वरीलप्रमाणे मिळुण आलेले गावठी हातभट्टी निर्मीती करण्याकरीता लागणारे साहित्य असा एकुण ११,८१,४००/— रू. चा मुद्देमाल जप्त केला. या कार्यवाही दरम्यान पारधी बेडयावरील सुमारे १६ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये कार्यवाही करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे मार्गदर्शनात तसेच सावनेरचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अशोक सरंभळकर यांचे नेतृत्वात पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, स्थानिक गुन्हे शाखा, कळमेश्वर चे ठाणेदार श्री. आसिफराजा शेख, सपोनि श्री.राजीव कर्मलवार, श्री. मुंडे, श्री. मेश्राम, श्रीमती सावळा, पोउपनि श्री. गायकवाड, आशिष

ठाकुर, श्रीमती प्रियंका गेडाम, सफौ/सपाटे, पोहवा/निलेश बर्वे, पोहवा/राजेंद्र सनोडिया, पोहवा/दुर्गाप्रसाद पारडे, पोहवा/उईके, पोहवा/मन्नान, पोना/दिनेश आधापुरे, पोना/राजेंद्र रेवतकर, पोना/आशिष मंगळे, पोना/किशोर वानखेडे, पोना अमोल कुथे, पोना/रवि मेश्राम, पोना/बोरकर, पोकॉ/महेश बिसने, पोकॉ/ आशुतोष लांजेवार, पोकॉ/निलेश उईके, पोकॉ ललित उईके तसेच पोलीस मुख्यालयातील राखीव आरसीपी पथक यांच्या विशेष पथकाने पार पाडली.

(सदर बातमी चा फोटो सोबत जोडला आहे.)

२) कुही हद्दीतील मौजा चांपा व वडद येथील पारधी बेडयांच्या दारू अड्डयावर धाड

दिनांक १४.१०.२०२१ रोजी उमरेड पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा वडद व चांपा येथील पारधी बेडयात मोठया प्रमाणावर अवैध गावठी दारू तयार करून गावठी दारूची मोठया प्रमाणावर आजूबाजूचे परिसरात विक्री होत असल्याची अशी खात्रीशिर माहिती नागपूर ग्रामीण चे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर यांना मिळाली. त्यावरून त्यांनी वडद व चांपा येथील पारधी बेडयावर जावुन प्रभावी कार्यवाही करण्याकरीता उमरेडचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. भिमराव टेळे यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल जिट्टावार आणि कुही चे पोलीस निरीक्षक चंद्रकांत मदने यांचे अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदारांचे विशेष पथक तयार करून पारधी बेडयावर सुरू असलेल्या अवैध दारू निर्मीती धंदयावर रेड करण्याकरीता गोपनियरित्या योजना तयार केली. नियोजनबध्द तयार केलेल्या योजनेनुसार दिनांक १४.१०.२०२१ चे पहाटे ०५.०० वा. च्या सुमारास उमरेडचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.भिमराव टेळे यांचे नेतृत्वातील दोन विशेष पथकाने एकाच वेळी वडद व चांपा पारधी बेडयाचा घेराव करून रेड केली. विशेष पथकातील पोलीसांनी मोठयाप्रमाणावर गावठी हातभट्टया उध्वस्त करून पारधी बेडयावरून एकुण ६२ ड्रम मध्ये प्रत्येकी १०० लिटर मोहाफुल सडवा रसायण ६२०० लिटर कि. ३,१०,०००/— रू व खाली ड्रम ३१,००० व गावठी हातभट्टी निर्मीती करण्याकरीता लागणारे साहित्य असा एकुण ३,४१,००/— रू. चा मुद्देमाल जप्त केला. या कार्यवाही दरम्यान पारधी बेडयावरील अज्ञात आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये कार्यवाही करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे मार्गदर्शनात उमरेडचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. भिमराव टेळे यांचे नेतृत्वात कुहीचे ठाणेदार चंद्रकांत मदने, सपोनि जितेंद्र वैरागडे, मसपोनि सुचिता मंडवाले, पोउपनि देविदास ठमके, पोहवा/नरेंद्र पटले, पोहवा/गजेंद्र चौधरी, पोहवा/महेश जाधव, पोना/रामराव आडे, पोकॉ/बालाजी साखरे, पोकॉ अजीज दुधकनोज, पोकॉ/अमृत किनगे, चापोहवा भाऊराव खंडाते पार पाडली.

(सदर बातमी चा फोटो सोबत जोडला आहे.)

## —: घरफोडी :—

पो.स्टे. बोरी :— अंतर्गत 2 कि.मी. अंतरावरील न्यु लोकमत कॉलनी बोरी येथील निवासी डॉ. विनय भिमराव कांबळे यांचे राहते घरी दिनांक 12.10.21 चे11.00 वा ते 13.10.21 च `08.00वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमांनी मकानाचे आतिल छतावरून प्रवेश करून सळाखी चे साहयाने कडीकोडा तोडुन आत प्रवेष करून फिर्यादीचे बेडरूम मधील लाकडी अलमारी मधील लॉकर मधुन 1 एक सोन्याची चैन जुनी 20 ग्रॅम वजनी किं 66,000/— 2—3 नग डिझाईनच्या चांदीच्या जुन्या पायपट्टी किं 3000/— एकुण किं. 69,000/— चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी डॉ. विनय भिमराव कांबळे वय 32 वर्ष रा.प्लॉट नं बी 1 सिडको कॉलनी बुटीबोरी चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. बुटीबोरी येथे अप क्रमांक 526/21 कलम 468/21 कलम 457,380 भादवी दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि पाथोडे मो. नं 7875685125 हे करित आहे.

**—: चोरी मोबाईल :—**

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत 14 मैल अमरावती रोड नागपुर येथे सहजाद खान मोहम्मद सफि खान रा.वार्ड क्र.1, 14 मैल अमरावती रोड नागपुर यांची मोबाईल दुकान असून दिनांक 12.10.21 चे 20.00 वा हे नौकर हसन याचे सह हजर असता दुकानात दोन इसम एक लाल रंगाचे टि—शर्ट घातलेला व दुसरा पिवळया रंगाचे टि—शर्ट घातलेला हे गाडीचे खरेदी करण्याकरिता आले असता सहजाद खान यांनी लाल रंगाचे टि—शर्ट घातलेल्या इसमास डेक दाखवायला दुकानांच्या आत घेवुन गेला व दुसरा पिवळया रंगाचे टि—शर्ट घातलेला इसम काउन्टर वर उभा होता त्यांनी काउन्टर वर ठेवलेला सहजाद चा मोबाईल xiao mi 10 T pro 5G कंपनीचा किमती अंदाजे 15,000/— चा सोबत घेवून जाताना सीसीटीव्ही फुटेज मध्ये आढळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी सहजाद खान मोहम्मद सफि खान वय 40 वर्ष रा.वार्ड क्र 1, 14 मैल अमरावती रोड नागपुर चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. कळमेश्वर येथे अप क्रमांक अप क्र. 569/2021 कलम 379 भादवी दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. पुढील तपास एएसआय हिवरकर मो नं 9881595999 हे करित आहे.

**—: मोटार सायकल चोरी :—**

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :— अंतर्गत 4 किमी अंतरावरील मौजा टाकळघाट येथील निवासी सौ. प्रिती राजु राय
यांचे पतीने नरेश नारायन लोंखडे यांचे कडुन सेकन्डहॅन्ड मोटार सायकल हीरो होन्डा पॅशन प्लस क्र एम.एच. 31 बी.एच. 8762 खरेदी केली होती फिर्यादीचे पती हे दुबई ला कामाकरीता गेल्याने सदरची मोटार सायकल फिर्यादीचा दिर सरोज राय हा कंम्पनीत येणे जाणे करीता वापरत होता दिनांक 12/10/2021 रोजी सायंकाळी कंम्पनी मधुन घरी आला मोटार सायकल घरासमोर उभी करुन रात्री घरीच जेवन करुन झोपला दुसरे दिवशी 07/30 वा.झोपेतुन उठुन पाहले असता त्याना आपली मोटार सायकल दिसुन आली नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी सौ. प्रिती राजु राय वय 27 रा वार्ड क्र 01 टाकळघाट .चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अप क्रमांक अप क्र. 266/2021 कलम 379 भादवी दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. पुढील तपास नापोशि प्रफुल्ल राठोड मो.88068 28560 हे करित आहे.

**—: चोरी गौण खनिज (रेती) :—**

पो.स्टे. उमरेड :— उमरेड पोलीस स्टेशन येथील सपोनि राजीव लोले हे आपल्या सहकारी अंमलदारांसह दिनांक 13/10/2021 रोजी रात्री दरम्यान बायपास चौक उमरेड येथे नाकाबंदी करीत असताना सुमांरे 03/30 च्या दरम्यान एका निळया रंगाची टिप्पर त्यामध्ये अंदाजे 05 ब्रास रेती भरल्याचे दिसले तसेच सदरचे टिप्परचे दोन्हा बाजुचे नंबर प्लेट खोडलेले होते. मागील नंबर प्लेट एम.एच. 40 बीएल 3895 अशी दिसुन आली. टिप्पर मधील वाळु बाबत चालक याला विचारना केली असता त्यांनी टिप्पर मधील रेतीची रॉयल्टी/परवाना नसलयाचे सांगीतले. सदरचा टिप्पर अवैधरित्या

रेतीची वाहतुक करीत असल्याचे आढळुन आल्याने चालकचे ताब्यातील टिप्पर क्र. एमएच 40 बी.एल. 3895 अशोक ले–लॅन्ड कंपनिचा 10 चक्का टिप्पर कि.25,00000/–व सदर टिप्परमध्ये 05 ब्रास रेती वाळु किं. 25,000/– असा एकुण 25,25000/– चा माल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी सपोनि राजीव लोले पोस्टे उमरेड यांचे याचे लेखी रिपोर्ट वरुन टिप्पर चालक आरोपी अविनाश मारोती चंडीमेश्राम वय 24 वर्ष रा जुनोना पोस्ट वलनी ता पवनी जि भंडारा याचे विरुध्द पो.स्टे.उमरेड येथे अप क्रमांक 709/2021 कलम 379 भादवी दाखल करण्यात आला असून पुढील तपास सपोनि. पाटील मोक्र.9049989341 हे करित आहे.

### –: अनैतीक अत्याचार, जबरी संभोग :–

पो.स्टे. मौदा :– पोलीस स्टेशन मौदा येथे दिनांक 13/10/2021 रोजी चिमुर जि. चंद्रपूर येथील पिडीत महिला यांनी हजर होवून आपली रिपोर्ट नोंदविली की, मौजा चिरव्हा मौदा येथील निवासी शिवराम संम्पतराव राजगीरे वय 65 रा चीरवा हा मुळबाळ होण्याकरीता आयुर्वेदीक औषधी देत असल्याने पिडीत महिला याला मुळबाह होत नसल्याने ती एप्रिल 2016 मध्ये शिवराम संम्पतराव राजगीरे चे भेटीला आली असता शिवराम संम्पतराव राजगीरे यांनी पिडीत महिलेला एकटीला घरामध्ये असलेल्या खोलीत बोलावले व तिला प्रसाद देउन तिच्या अंगात भुत आहे असे म्हणुन तिच्या डोक्यावरुन लिंबु कापला व स्तानाला, गुप्तांगाला राख लावली व तिच्या सोबत जबरी शारीरीक संबध प्रास्थापीत केले त्या नंतर तो सतत तु कोणाला सांगु नको नाही तर तुला जिवानीशी मारुन टाकीन अशी धमकी देउन चाकुची भिती दाखवुन जबरदस्तीचे शारीरीक संबध प्रस्थापीत करु लागला

सदर प्रकरणी फिर्यादी चे तोंडी रिपोर्ट वरुन रिर्पोट आरोपी शिवराम संम्पतराव राजगीरे वय 65 रा चीरवा चे विरुध्द पोलीस स्टेशन मौदा येथे अप क्रमांक 630/21 कलम 376 506 भादवी अनुसुचीत जाती अ. जमाती अत्याचार प्र. अ. सुधारीत 2015 चे कलम (3)(1) (डब्लु) (आय) (1) (डब्लु) (ii) (3) (2) (व्हि. ए) दाखल करण्यात आला. पुढील तपास उप विभागीय पोलीस अधिकारी श्री.मुख्तार बागवाण .कन्हान विभाग कन्हान मो.क्र.9082507075 हे करित आहेत.

### –: अपघात :–

पो.स्टे.नरखेड :– अंतर्गत मौजा मन्नात खेडी येथील निवासी सौ. मनीषा पवन बोरीवार हया दिनांक 13/10/21 रोजी देवदर्शनाकरिता चे पती व दोन भाच्या सह मोटार सायकलने क्र. एमएच 40 एएच 3477 ने सावरगाव काटोल मार्गे पारडसिंगा येथे देवदर्शनाकरिता जात असता 12/00 ते 13/00 वा दरम्यान सावरगावचे समोर वळनावर स्कॉर्पीओ वाहन क्र. एमएच 40 एसी 6712 चा चालक चंद्रशेखर भुजाडे चे आपले वाहन निष्काळजीपणा व भरधाववेगाने चालवुन आमोरासमोर धडक देवुन मोटारसायकल वरील चालक,पत्नी व दोन्ही भाच्या गंभीर जखमी होवुन एक भाची परी शरद वाघाडे वय 8 वर्ष ही जागीच मरण पावली आहे. फिर्यादीच्या बयानावरून व सर तर्फे गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी सौ. मनीषा पवन बोरीवार वय 23 वर्ष रा मन्नात खेडी मो.क्र. 9022067024 यांचे तोंडी रिपोर्ट वरुन स्कॉर्पीओ वाहन क्र. एमएच 40 एसी 6712 चा चालक चंद्रशेखर भुजाडे याचे विरुध्द पो.स्टे.नरखेड येथे अप क्रमांक 260/21 कलम 304(अ) 279,337,338 भादवी 184 मोवाका दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउपनी बोथले मो क्र.9990375396 हे करित आहे.

## —: कत्तलीसाठी जाणारे गोवंशाची सुटका :—

पो.स्टे.मौदा :— दिनांक 13/10/2021 रोजी रात्री दरम्यान पोलीस स्टेशन मौदा येथे मिळालेल्या माहिती वरुन माथनी टोल प्लॉजा येथे मौदा पोलीसांची नाकाबंदी केली असता योध्दा झोनॉन क्र एम एच 33/जी 1302 सादर वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये एकुन 14 गाई व गोरे (लाल व पांढ—या रंगाचे लहान मोठे) त्यांचे तोंड पाय दोरीने बांधुन त्यांना क्लेशने वागणुक देवुन तसेच त्यांना कोणत्याही प्रकारची चा—या पाण्याची व्यवस्था न करता वाहनात कोंबुन बांधुन कत्तलीसाठी विक्रीकरीता अवैध्यरीत्या घेऊन जातांनी मिळुन आला. त्याचे ताब्यातुन एकुन 14 गोवंश प्रत्येकी कि. 10.000 रु प्रमाणे एकुण कीं 1,40,000 रु व वाहन क्र एमएच 33 जी—1302 कि. 3,00,000/— जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी पो.शी. संजय अनिल बरोदीया वय 31 पो स्टे मौदा यांचे लेखी रिपोर्ट वरुन वाहन क्र एमएच 33 जी—1302 चा चालक दिनेश हरीचंद्र गायधने चे विरुध्द पो.स्टे. मौदा येथे अप क्रमांक 629/21कलम 11(1)(डी) भादवी. कलम 5 अ प्राणी सुधारण अधिनियम कलम 9 दाखल करण्यात आला असून पुढील तपास सपोनी सोनेकर मो.क्र.89759 21770 हे करित आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर